In compliance with the aforesaid circulars and regulatory requirements, the Notice of the EGM will be sent to all the Members through electronic mode whose email addresses are registered with the Company/Registrar & Share Transfer Agent (namely, MUFG Intime India Private Limited) as on Friday, 17th January, 2025. The said Notice of EGM will also be available on the Company's website at www.nrbindustrialbearings.com and on the website of the Stock Exchanges, viz., BSE Limited-www.bseindia.com and the National Stock Exchange of India www.nseindia.com
In terms of Section 108 of the Act read with Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014, the Resolutions for consideration at the EGM will be transacted through remote e-voting (i.e. facility to cast vote prior to EGM) and also e-voting during EGM, for which the services of Central Depository Services (India) Limited ("CDSL") have been engaged by the Company. The detailed procedure for casting vote shall be provided in the Notice of EGM. The remote e-voting period will commence on Saturday, 8th February, 2025 at 9.00 a.m. (IST) and end on Tuesday, 11th February, 2025 at 5.00 p.m (IST). During this period members of the Company holding shares either in physical or dematerialized form as on the cut-off date on Wednesday, 05th February, 2025 may cast their vote by remote e-voting or by e-voting at the time of EGM.
**Manner to register/update email addresses:**
i) Members holding share(s) in physical mode are requested to send the relevant details for registration of their email address namely, Folio No., name of shareholder, mobile no., email address and self- attested copy of PAN and Aadhar card by email to the Company at investorcare@nibl.in
ii) Members holding share(s) in electronic mode are requested to register/update their email addresses, PAN and Bank Account details with the Depository Participants (DPs) where their respective dematerialized accounts are maintained.
**Manner of casting vote through e-voting:**
The remote e-voting as well as e-voting at the EGM on the proposals contained in the Notice of the EGM dated 20th January, 2025 will be conducted on the e-voting system to be provided by CDSL in following manner
i) The login credentials for casting the votes through e-voting shall be made available to the Members through email after they successfully register their email addresses in the manner provided above.
ii) Detailed instructions to Members for casting vote through remote e-voting shall be given in the Notice of the EGM.
This Notice is being issued for the information and benefit of all the Members of the Company in compliance with the applicable circulars issued by MCA and SEBI.
**For NRB Industrial Bearings Limited**
Sd/-
**Vandana Yadav**
**Company Secretary**
**Place : Mumbai**
**Date : 20th January, 2025**

**WESTERN RAILWAY TO RUN SUPERFAST SPECIAL TRAIN BETWEEN AHMEDABAD ⇄ BANDRA TERMINUS**

| TRAIN NO. | ORIGINATING STATION & DESTINATION | DATE OF SERVICE | DEPARTURE | ARRIVAL |
|---|---|---|---|---|
| 09462 | AHMEDABAD - BANDRA TERMINUS | 24.01.2025 | 20:00 hrs. (Friday) | 04:20 hrs. (Next Day) |
| 09461 | BANDRA TERMINUS - AHMEDABAD | 25.01.2025 | 05:35 hrs. (Saturday) | 13:45 hrs. (Same Day) |

**Halts:** Vadodara, Udhna, Valsad, Vapi, Dahanu Road and Borivali station in both directions.
**Composition:** AC 3-Tier, Sleeper Class and General Second Class Coaches.
For detailed information regarding timings, halts and composition, passengers may please visit www.enquiry.indianrail.gov.in
The Booking for Train Nos. 09462 and 09461 will open from 22.01.2025 at PRS Counters and on IRCTC website. The above trains will run as Special Trains on Special Fare.
**WESTERN RAILWAY**
wr.indianrailways.gov.in
Like us on: facebook.com/WesternRly
Follow us on: X.com/WesternRly
PLEASE CARRY ORIGINAL ID PROOF FOR ALL RESERVED TICKETS

# ‘कोल्ड प्ले’ कन्सर्टचा जेएनपीएच्या वाहतुकीला फटका

## हजारो वाहने रस्त्यावरच; वाहतूकदारांचे प्रचंड आर्थिक नुकसान



राजकुमार भगत/ उरण

नवी मुंबईतील डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियममध्ये आयोजित केलेल्या ‘कोल्ड प्ले’ या जागतिक दर्जाच्या कन्सर्टमुळे जेएनपीटीतून बाहेर जाणाऱ्या अवजड वाहनाना बंदी घातल्याने वाहतूकदारांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे या ‘कोल्ड प्ले’ कन्सर्टचा आम्हाला भूर्दंड का असा सवाल वाहतूकदारांकडून विचारण्यात येत आहे. या कन्सर्टमुळे रोज हजारो वाहने जेएनपीएच्या आणि परिसरातील रस्त्यावर थांबवून ठेवण्यात येत आहेत.

नवी मुंबईतील डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियम, नेरूळ येथे ‘कोल्ड प्ले’ या जागतिक दर्जाच्या संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे स्टेडियमला कलावंत, महत्त्वाच्या व्यक्ती व प्रेक्षकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने व वाहतूककोंडी होऊ नये, याकरीता दिनांक तीन दिवस दुपारी २ ते रात्री १२ वाजेपर्यंत नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सर्व प्रकारच्या जड-अवजड मालवाहतूक करणाऱ्या वाहनांना शहराच्या सर्व मार्गावरून मार्गस्थ होण्यास, प्रवेश करण्यास आणि वाहने उभी करण्यास पूर्णतः बंदीबाबत पोलीस उपायुक्त (वाहतूक) नवी मुंबई यांनी वाहतूक नियंत्रण अधिसूचना निर्गमित केलेली आहे. कार्यक्रमाच्या निमित्ताने नवी मुंबई शहरात दहा ते पंधरा हजार अधिकची वाहने येण्याची शक्यता वाहतूक पोलिसांनी वर्तवली होती. वाहनांच्या गर्दीमुळे शहरात वाहतूककोंडी होणार असून त्याचा फटका सर्वसामान्य प्रवाशांना बसला आहे. वाहतूककोंडी टाळण्यासाठी तीन दिवस अवजड वाहनाना नवी मुंबईत प्रवेश बंदी करण्यात आली आहे. या वाहतूक बंदीमुळे ज्या ठरलेल्या ट्रीप आहेत, त्या होत नसल्यामुळे जो टाइम लिमिट दिला आहे तो टळून जात असल्यामुळे वाहतूकदारांवर दंड भरण्याची वेळ आली आहे.

शिवाय वाहतुकीची रांग लागते आणि त्यामुळे वाहनांचा मेंटेनन्स वाढतो. त्यामुळे वाहतूकदारांना आर्थिक फटका सहन करावा लागत असल्याची वाहतूकदारांची तक्रार आहे. त्यामुळे यातून कायमस्वरूपी तोडगा काढावा अशी मागणी वाहतूकदारांकडून करण्यात येत आहे. रोज हजारो वाहने अशा प्रकारे रस्त्यावर थांबवून ठेवण्यात येत असल्यामुळे वाहतूकदारांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. शिवाय जेएनपीए या आंतरराष्ट्रीय बंदरातून निर्यात माल वेळेवर पोहचविला जात नसल्यामुळे आणि जेएनपीए बंदरात जहाजे थांबून राहतात. त्यामुळे जहाजांचा वेळ आणि खर्च देखील वाढतो, त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर जेएनपीएची बदनामी होत आहे.

> नवी मुंबई किंवा ठाणे येथे कोणताही मोठा कार्यक्रम असला किंवा मोठी व्यक्ती येणार असली तरी जेएनपीएतून जाणारी व येणारी वाहतूक थांबविली जाते. वास्तविक पाहता याचा जेएनपीएच्या वाहतुकीशी काही संबंध नाही. जेएनपीएतील बहुतांश ९५ टक्के ही वाहतूक जेएनपीए परिसरातच होते. त्यामुळे ही वाहतूक थांबविणे म्हणजे निव्वळ आडमुठेपणा आहे. मंगळवारी शेवटचा दिवस असल्यामुळे सकाळपासूनच अवजड वाहनांना थांबवून ठेवण्यात आले आहे, ही वाहतूकदारांची पिळवणूक आहे.
>
> - **पंढरीनाथ गांजवे**, (वाहतूकदार, रॉयल ट्रान्सपोर्ट)

> पोलीस आयुक्तालयाच्या नोटीफिकेशननुसार आम्ही दुपारी २ ते रात्री १२ पर्यंत अवजड वाहनांना बंदी केली आहे. कार्यक्रम संपल्यानंतर पुन्हा ही वाहतूक नेहमीप्रमाणे सुरू करण्यात येईल.
>
> - **अतुल दहिफळे**, (पोलीस निरिक्षक, उरण वाहतूक शाखा)

## निवडक

### विकासकामांची आयुक्तांकडून पाहणी

**उल्हासनगर** : उल्हासनगर शहरातील प्रगती आणि नागरिकांना उत्कृष्ट पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उल्हासनगर महापालिकेच्या नवनियुक्त आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी विकासकामांवर लक्ष केंद्रित केले आहे. आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्या नेतृत्वाखाली एमएमआरडीएद्वारे सुरू असलेल्या सात प्रमुख रस्त्यांच्या कामांची, तसेच गोल मैदान आणि स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे क्रीडासंकुल येथील महत्त्वाकांक्षी क्रीडा संकुल प्रकल्पांची पाहणी करण्यात आली. कामाच्या गतीला नवी दिशा देण्यासाठी आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले. उल्हासनगर महापालिकेच्या विविध प्रकल्पांना गती देण्यासाठी आयुक्त मनीषा आव्हाळे यांचा हा दौरा महत्त्वाचा ठरला आहे. यामध्ये प्रकल्पाच्या कामांमध्ये वेळेचे नियोजन करून गती वाढवण्यावर भर देण्यात आला.

### राज्यभर संविधान गौरव अभियान राबविणार

**डोंबिवली** : भाजपमार्फत संविधान गौरव अभियान पूर्ण देशभर चालू असून या संविधानाचे संयोजक राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे आहेत. महाराष्ट्रामध्ये राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संविधान गौरव अभियान सुरू आहे. राज्याचे संयोजक आमदार अमित गोरखे आहेत. या बैठकीला माजी मंत्री दिलीप भाऊ कांबळे, माजी मंत्री भाई गिरकर तसेच राज्याच्या सरचिटणीस माधवीताई नाईक यांनी या बैठकीला मार्गदर्शन केले.राज्यभर संविधान गौरव अभियानाचे कार्यक्रम राबविले जात असून हे अभियान २६ तारखेपर्यंत राबविण्यात येणार आहे.

# शहरांच्या सुरक्षेला ठाणे महापालिकेचा अडसर?

## पोलिसांच्या सीसीटीव्ही बसवण्याच्या कामाला ब्रेक

अतुल जाधव/ठाणे

शहरांमधील गुन्हेगारीला आळा बसावा तसेच शहरे सुरक्षित व्हावी यासाठी संपूर्ण ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात तब्बल ६ हजारांपेक्षा अधिक सीसीटीव्हीचे जाळे बसवण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव ठाणे पोलिसांकडून तयार करण्यात आला. विशेष म्हणजे ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रात येत असलेल्या इतर महापालिकांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याच्या कामाला परवानगी दिली असताना ठाणे महापालिकेकडून मात्र अद्याप या कामासाठी हिरवा कंदील मिळालेला नाही. ठाणे महापालिकेच्या परवानगी अभावी ठाणे पोलिसांना हे काम सुरू करता येत नसल्याने सुरक्षेसंबंधी पालिका उदासीन असल्याचे पहावयास मिळत आहे.

जिल्ह्यातील ठाणे, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर या शहरात ६ हजाराहून अधिक अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रस्ताव ठाणे पोलिसांनी तयार केला आहे. या पाच शहरांमध्ये १ हजार ९९७ ठिकाणी हे कॅमेरे बसविण्यात येणार आहे. शहरातील सिग्नल परिसर, मुख्य चौक, शाळा, महाविद्यालय तसेच निर्जन ठिकाणी हे कॅमेरे बसविले जाणार आहे. या कॅमेऱ्याच्या माध्यमातून शहरातील वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबरोबरच गुन्हेगारीला पायबंद घालणे शक्य होणार आहे.

ठाणे, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर ही शहरे ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात येतात. या शहरांमध्ये एकूण ३५ पोलीस ठाणे आहेत. त्यामुळे त्या शहरांमध्ये कॅमेरे बसवण्यासाठी रस्ते खोदणे तसेच इतर कामांसाठी संबंधित महापालिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. इतर महापालिकांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी परवानगी दिली असल्याची माहिती ठाणे पोलिसांकडून देण्यात आली आहे. मात्र ठाणे महापालिका क्षेत्रात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी अद्याप परवानगी मिळाली नसल्याची माहिती ठाणे पोलिसांकडून मिळाली आहे. यासंदर्भात ठाणे महापालिकेशी संपर्क केला असता सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा ठाणे पोलिसांचा प्रस्ताव आला असल्याचे पालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात ३०० किमीचे काम असून हे काम करण्यासाठी ठाणे पोलिसांना आम्ही काही पर्याय दिले असल्याचे पालिकेचे म्हणणे आहे. यामध्ये खोदकाम करताना कमीत कमी नुकसान व्हावे, असा यामागे उद्देश असून त्यामुळे अद्याप परवानगी दिली नसल्याची माहिती पालिकेच्या सूत्रांनी दिली आहे. ठाणे महापालिकेच्या परवानगी अभावी ठाणे पोलिसांना काम सुरू करता येत नसल्याने सुरक्षेच्या कामाला मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

### कॅमेऱ्यांची वैशिष्ट्ये...



या प्रस्तावानुसार स्थिर कॅमेरे, ३६० डिग्रीमध्ये फिरणारे कॅमेरे, लांबून तसेच अंधारात वाहनांचे क्रमांक स्पष्ट दिसतील असे एएचपीआर कॅमेरे, तर वाहनांचा वेगाची नोंद करणारे आरएलव्हीडी कॅमेरे अशा प्रकारचे अत्याधुनिक कॅमेरे बसविण्यात येणार असून ते ठाणे पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला जोडण्यात येणार आहेत. त्यामुळे पोलिसांनी नियंत्रण कक्षात बसून संपूर्ण शहरातील गुन्हेगारीवर तसेच वाहतूककोंडीवर लक्ष ठेवणे शक्य होणार आहे.

### सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची आवश्यकता का?



गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शहरात ठाणे महापालिकेने शहरात १७५० सीसीटीव्ही कॅमेरे बसविले असली तरी भौगोलिक रचनेच्या तुलनेत शहरात कॅमेऱ्यांची संख्या पुरेशी नाही. कल्याण-डोंबिवली महापालिकेने शहरात स्मार्टसिटी अंतर्गत एक हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. ठाणे आणि कल्याण वगळता कल्याण वगळता ठाणे, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे आवश्यक आहे.

### कोणत्या भागात किती कॅमेरे...

| शहरे | ठिकाणे | सीसीटीव्हींची संख्या |
|---|---|---|
| ठाणे ते दिवा | ९१७ | ३१६३ |
| भिवंडी | ५५५ | १३४७ |
| उल्हासनगर ते | ५२५ | १५४१ |
| बदलापूर | – | – |
| एकूण | १९९७ | ६०५१ |



# महापालिका कर्मचाऱ्यांच्या पीएफबाबतचे प्रश्न मार्गी

**नवी मुंबई** : महापालिका प्रशासनातील घंटागाडी विभागातील कर्मचारी, परिवहन सेवेतील कंत्राटी कर्मचारी, शिरवणे व महापे एमआयडीसीतील कर्मचाऱ्यांच्या पीएफबाबतच्या रेंगाळलेले अनेक प्रश्न कामगार नेते रवींद्र सावंत यांच्या नेतृत्वाखाली सोडविण्यात महाराष्ट्र कर्मचारी युनियनला यश आले आहे.

बऱ्याच महिन्यांपासून महापालिका सेवेतील तसेच एमआयडीसी विभागातील कर्मचाऱ्यांचे पीएफसंदर्भात बरेच प्रश्न प्रलंबित होते. कर्मचारी पीएफ कार्यालयात चकरा मारूनही कोणी त्यांना दाद देत नव्हते. त्यातच पीएफची कार्यवाही ऑनलाइन झाल्याने कर्मचाऱ्यांच्या अडचणी वाढतच गेल्या. महाराष्ट्र कर्मचारी युनियनच्या माध्यमातून कामगार नेते रवींद्र सावंत यांच्या नेतृत्वाखाली पालिका व एमआयडीसी कर्मचाऱ्यांच्या पीएफविषयक समस्या सोडविण्यासाठी शिष्टमंडळ वाशीतील पीएफ कार्यालयात गेले होते. या शिष्टमंडळात महाराष्ट्र कर्मचारी युनियनचे वाहन विभागाचे राजन सुतार, परिवहन ठोक मानधन विभागाचे अध्यक्ष नितीन गायकवाड, उपाध्यक्ष राजेंद्र जाधव, देसाई बुवा व एजी इन्वा रो कंपनीचे मॅनेजर सहभागी झाले होते.

यावेळी कार्यालयात उपस्थित असलेल्या पीएफच्या अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करताना कामगार नेते रवींद्र सावंत यांनी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या व त्यातून निर्माण झालेल्या अडचणी पीएफ अधिकाऱ्यांसमोर विषद केल्या.

# आरटीईच्या ११ हजार जागांसाठी साडेदहा हजार अर्ज

**ठाणे** : शिक्षण हक्क कायदा अर्थात आरटीई अंतर्गत विविध शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी ठाणे जिल्ह्यात १० हजार ५०० अर्जांची नोंदणी झाली आहे. गेल्या आठवड्यात १४ जानेवारीपासून ऑनलाइन अर्ज भरण्याला सुरुवात झाली असून ठाणे जिल्ह्यासाठी ११ हजार ३२० जागांचा राखीव कोटा आरटीई अंतर्गत ठेवण्यात आला आहे. ऑनलाइन अर्ज करण्यासाठी आणखी ७ दिवसांची मुदत असून २७ जानेवारीपर्यंत पालकांना ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. त्यामुळे राखीव जागांपेक्षा अर्ज जास्त येण्याची शक्यता आहे.

आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या घटकातील मुलांना खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षण घेता यावे, याकरिता आरटीई कायद्यांतर्गत २५ टक्के जागांवर प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. ठाणे जिल्ह्यातील आणि महापालिका क्षेत्रातील ६२७ शाळा आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र ठरल्या असून ११ हजार ३२० जागांसाठी ही प्रवेश प्रक्रिया पार पडणार आहे. ठाणे जिल्ह्यातून आठवड्याभरात म्हणजे १४ जानेवारी ते २० जानेवारीपर्यंत १० हजार ५०६ अर्ज दाखल झाले असल्याची माहिती आरटीई संकेतस्थळावरून प्राप्त झाली आहे.

# बांगलादेशींविरोधात मनसेचे निवेदन

**भिवंडी** : भिवंडी तालुक्यातील सरवली, कोनगाव, पिंपळास, रांजनोली गावांच्या हद्दीत असलेल्या औद्योगिक पट्ट्यात असणाऱ्या कंपन्यांसह गोदामांमध्ये बेकायदेशीरपणे काम करणाऱ्या बांगलादेशी घुसखोरांविरोधात कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष परेश चौधरी यांनी कोनगाव पोलीस ठाण्याचे वपोनि मस्के यांना भेटून निवेदन देऊन केली आहे. यावेळी मनसे जिल्हा सचिव संजय पाटील, मनसे जनहित कक्ष जिल्हा संघटक अॅड. सुनील देवरे, मनसे उपतालुका अध्यक्ष पुरुषोत्तम म्हात्रे, मनविसे जिल्हा सचिव हर्षल भोईर, जनहित सचिव रोशन भाने, विशाल पाटील आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# उल्हासनगरमध्ये पुन्हा गॅस वाहिनी फुटली



**उल्हासनगर** : उल्हासनगरमधील कुर्ला कॅम्प परिसरात मंगळवारी सकाळी रस्त्याच्या खोदकामादरम्यान घडलेल्या दुर्घटनेने शहरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण केले. भूमिगत महानगर गॅस वाहिनीला लागलेल्या धक्क्यामुळे मोठ्या प्रमाणात गॅस गळती झाली. गळतीमुळे परिसरात गॅसचा उग्र वास पसरला होता. मात्र, तातडीच्या उपाययोजनांमुळे मोठा अनर्थ टळला आहे.

उल्हासनगर कॅम्प क्रमांक चार परिसरात रस्त्याचे खोदकाम सुरू असताना जेसीबी मशीन गॅस वाहिनीला धडकले. या धडकेत वाहिनी डॅमेज होऊन गॅस मोठ्या प्रमाणावर लीक होऊ लागला. गळतीसह मोठा आवाज येऊ लागल्याने नागरिक घाबरून घराबाहेर पडले. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले. त्यांनी तत्काळ परिसराची पाहणी करून सुरक्षिततेच्या उपाययोजना केल्या. महानगर गॅसच्या अधिकाऱ्यांनीही त्वरित गळती रोखण्याचे प्रयत्न सुरू केले. वाहिनी दुरुस्तीचे काम वेगाने सुरू करण्यात आले.

**सूचना**

**“ऑल इंडिया इन्स्टिट्युट फॉर हेल्थ एज्युकेशन इन लेप्रसी” (ट्रस्ट)** ज्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता आहे - टॅक्सीमेन्स सर्व्हिसेस, १ ला मजला, बीईएसटी डेपोसमोर, दिंडोशी, गोरेगाव (पू.), मुंबई-४०००६३ च्या ट्रस्टीजकडून मोहोरबंद पाकिटातून “जसे आहे जेथे आहे तत्वावर” सावरोली, ग्राम पंचायत दहीवली, तालुका अंबरनाथ, जि. ठाणे येथील सर्व्हे क्र. १९, भाग २ए (हिस्सा क्र. २) धारक ती सर्व अखंड जमीन (२३ आर) असलेल्या ट्रस्टच्या जमिनीच्या विक्रीसाठी लेखी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

मोहोरबंद प्रस्ताव उपरोल्लेखित पत्त्यावर ह्या प्रकाशनाच्या तारखेपासून ३० दिवसांत पोचते केले पाहीजेत. कंत्राटासाठी वेळ अति महत्वाचा असून ३० दिवसांनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

ट्रस्टच्या मिळकतीच्या विक्रीसाठी अटी व शर्तींची एक प्रत वरील पत्त्यावर येथे वर दिलेल्या नोंदणीकृत पत्त्यावरून रु. १००/- प्रदान केल्यावर २२/०१/२०२५ ते २१/०२/२०२५ पर्यंत कोणत्याही कामाच्या दिवशी स. ११.०० वा. ते. दु. १.०० वा. दरम्यान उपलब्ध होईल.

ट्रस्टकडून प्रस्ताव प्राप्त केले जाण्यासाठीची अंतिम तारीख आहे, वर्तमानपत्रात सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ३० दिवस ट्रस्टकडून घालून देण्यात आलेल्या अटी व शर्तींचे काटेकोर पालन प्रस्तावकर्त्यांना करावे लागेल.

बोली लावणाऱ्या इच्छुक व्यक्तींनी त्यांच्या प्रस्ताव पत्रासोबत प्रस्ताव रकमेच्या १०% रकमेसाठी **“ऑल इंडिया इन्स्टिट्युट फॉर हेल्थ एज्युकेशन इन लेप्रसी”** च्या नावातील एक धनादेश/डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर जोडली पाहीजे. प्रस्ताव स्वीकारला न गेल्यास सदर रक्कम व्याजाशिवाय परत केली जाईल, तथापि, एकदा का प्रस्ताव स्वीकारला की, विक्री साठीचा प्रस्ताव संपुष्टात आणला, किंवा रद्द केला किंवा ठरविण्यात आल्यास इसारा रक्कम किंवा त्यानंतर केलेले अन्य कोणतेही प्रदान परत केले जाणार नाही. सदर मिळकतीची विक्री धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मंजुरी देण्या अधीन असेल. प्रस्तावाना २२/०२/२०२५ रोजी दु. ३.०० वा. (वर्तमानपत्रात सूचनेच्या प्रकाशनाच्या ३१ व्या दिवसानंतर असल्याने) वरीलप्रमाणे ट्रस्टच्या नोंदणीकृत पत्त्यावर उघडण्यात येईल. ज्यामध्ये प्रस्तावकर्ते हजर राहू शकतात. सशर्त प्रस्ताव किंवा अपूर्ण अर्ज प्रपत्रे विचारात घेतले जाणार नाहीत आणि ट्रस्टने सुधारणांसह किंवा शिवाय प्रस्ताव स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.

**फ्रेडरिक डी'सा**
(ट्रस्टी)

NRB INDUSTRIAL

**एनआरबी इंडस्ट्रियल बेअरिंग्ज लिमिटेड**
सीआयएन : L29253MH2011PLC213963
नोंदणीकृत कार्यालय : धन्नूर, २रा मजला, १५, सर पी.एम. रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दूर. क्र. ०२२ - ४५४१७५०० फॅक्स क्र. ०२२ - २२७० ४२०७
ईमेल : investorcare@nibl.in वेबसाईट : www.nrbindustrialbearings.com

**सभासदांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) / इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमे (ओएव्हीएम) यादवारे आयोजित करण्यात येणाऱ्या असाधारण सर्वसाधारण बैठकीबाबत सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, एनआरबी इंडस्ट्रियल बियरिंग्ज लिमिटेड ("कंपनी") च्या सभासदांची अतिरिक्त असाधारण सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी दुपारी २.०० (भा.प्र.वे.) वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) / इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमे (ओएव्हीएम) याद्वारे इजीएमच्या सुचनेमध्ये नमूद केलेले विशेष कामकाज पार पाडण्यासाठी कंपनी अधिनियम २०१३ (“अधिनियम”) च्या प्रयोज्य तरतुदी तसेच त्या अंतर्गत तयार केलेली नियमावली आणि सुधारित भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ(सूचिबद्धता बंधने आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमावली २०१५ सहवाचता कंपनी कामकाज मंत्रालयाने (“एमसीए”) जारी केलेले दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ रोजीचे सामान्य परिपत्रक क्रमांक ९/२०२३ (यात यानंतर एकत्रितपणे “एमसीए परिपत्रके” असा उल्लेख करण्यात आलेला आहे.)आणि अंतिम विस्तारीत दिनांक १९ सप्टेंबर २०२४ रोजीचे सामान्य परिपत्रक क्रमांक ०९/२०२४ आणि दिनांक १३ मे २०२२ रोजीचे भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ(सेबी) परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडीर/ सीआयआर/ पी/२०२२/६२ आणि २० जानेवारी २०२५ रोजी इजीएमच्या सुचनेत नमूद केल्याप्रमाणे विशेष व्यवसायाचे व्यवहार करण्यासाठी सेबीने जारी केलेली अन्य परिपत्रके यांचे अनुपालन करून आयोजित करण्यात येईल.

वरील परिपत्रके आणि नियामक आवश्यकता यांचे पालन करून, ज्या सभासदांचे ईमेल पत्ते शुक्रवार, दिनांक १७ जानेवारी, २०२५ अनुसार कंपनी/निबंधक आणि शेअर हस्तांतरण एजंट (म्हणजेच, एमयुएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) यांच्याकडे नोंदणीकृत आहेत, अशा सर्व सभासदांना इजीएमची सूचना इलेक्ट्रॉनिक स्वरुपात पाठविण्यात येईल. सदर इजीएमची सूचना कंपनीच्या www.nrbindustrialbearings.com या वेबसाइटवर आणि स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाइटवर, म्हणजेच बीएसई लिमिटेडच्या- www.bseindia.com या वेबसाइटवर आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडियाच्या www.nseindia.com या वेबसाइटवर वर देखील उपलब्ध राहील.

सदर अधिनियमाचे कलम १०८ सहवाचता कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१४ चा नियम २० अनुसार, इजीएममध्ये विचारार्थ घेण्याच्या ठरावावर दूरस्थ इ-मतदानाद्वारे (म्हणजेच इजीएमच्या आधि मत नोंदविण्याची सुविधा)आणि तसेच इजीएम च्या दरम्यान इ-मतदानाद्वारे मत घेण्यात येईल, ज्यासाठी कंपनीने सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ("सीडीएसएल") च्या सेवा घेतलेल्या आहेत. मतदानाची सविस्तर प्रक्रिया इजीएमच्या सूचनेत दिली जाईल. दूरस्थ इ-मतदानाचा कालावधी शनिवार, दिनांक ८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता (भारतीय प्रमाण वेळेनुसार) सुरु होईल आणि मंगळवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता (भारतीय प्रमाण वेळेनुसार) संपेल. या कालावधीत, बुधवार, दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या कट-ऑफ तारखेला मूर्त किंवा अमूर्त स्वरूपात शेअर्स धारण करणा-या कंपनीच्या सभासदांना दूरस्थ इ-मतदानाद्वारे किंवा एजीएमच्या वेळी इ-मतदानाद्वारे आपापले मतदान करता येईल.

**ईमेल पत्ते नोंदणी/अद्ययावत करण्याची पद्धत:**

१) मूर्त स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सभासदांना विनंती करण्यात येते कि, त्यांनी त्यांच्या ईमेल पत्त्याच्या नोंदणीसाठी संबंधित तपशील जसे की फोलिओ क्रमांक, भाग धारकाचे नाव, मोबाईल क्रमांक, ईमेल पत्ता आणि पॅन कार्ड आणि आधार कार्डची स्व-प्रमाणित प्रत कंपनीला investorcare@nibl.in या ईमेलवर पाठवावी.

२) इलेक्ट्रॉनिक पद्धतीने शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांना विनंती करण्यात येते कि, त्यांनी त्यांचे ईमेल पत्ते, पॅन कार्ड आणि बँक खात्याचे तपशील, जिथे त्यांचे संबंधित डिमॅट खाते आहे, त्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट (डीपी) कडे नोंदवावे/ अद्यावत करावे.

**ई-मतदानाद्वारे मतदान करण्याची पद्धत:**

दिनांक २० जानेवारी २०२५ रोजीच्या इजीएमच्या सूचनेतील प्रस्तावांवर इजीएममध्ये खाली दिलेल्या पद्धतीने सीडीएसएल द्वारे प्रदान केलेल्या इ-मतदान प्रक्रियेनुसार दूरस्थ इ-मतदान तसेच इ-मतदान पार पाडण्यात येईल.

१) सभासदांना वर दिलेल्या पद्धतीने त्यांचे ईमेल पत्ते यशस्वीरित्या नोंदणीकृत केल्यानंतर, इ-मतदानाद्वारे मतदान करण्यासाठी ईमेलद्वारे लॉगिन क्रेडेन्शियल्स उपलब्ध करून दिले जातील.

२) सभासदांना दूरस्थ इ-मतदानाद्वारे मतदान करण्यासाठीची सविस्तर माहिती इजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात येईल.

सर्व सभासदांना एमसीए आणि सेबीने जारी केलेल्या प्रयोज्य परिपत्रकांचे पालन करून त्यांच्या माहितीसाठी आणि हितासाठी ही सूचना जारी करण्यात येत आहे.

**एनआरबी इंडस्ट्रियल बेअरिंग्ज लिमिटेडसाठी**
**सही/-**
**वंदना यादव**
**कंपनी सचिव**

ठिकाण: मुंबई
दिनांक: २० जानेवारी, २०२५

## सुमारे १०० किलो प्लास्टिकचा साठा जप्त

# प्लास्टिक पिशव्यांविरोधात पालिकेची कारवाई

नव शक्ति इम्पॅक्ट



अरविंद गुरव/पेण

२०१८ साली केंद्रासह राज्य शासनाने कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्या आणि वस्तूंच्या वापरावर बंदी आणली आहे. देशासह राज्यात प्लास्टिक मुक्त अभियान राबविले जात आहे. मात्र रायगड जिल्ह्यासह पेण तालुक्यात प्लास्टिकचा वापर सर्रास होत आहे, त्यामुळे येथील पर्यावरणाचा श्वास कोडत आहे. तसेच मोकाट आणि पाळीव जनावरांचे भक्ष या प्लास्टिकच्या पिशव्या बनत असल्याने अनेक जनावरांचा मृत्यू देखील होत आहेत. पेणमध्ये होत असलेल्या प्लास्टिक वापराबाबत दैनिक ‘नवशक्ति’मध्ये शनिवारी बातमी प्रसिद्ध झाली होती. या बातमीची पेण नगरपालिकेकडून दखल घेऊन त्वरीत कारवाईला सुरवात झाली आहे. त्यामुळे प्लास्टिक पिशव्यांचा वापर आणि साठा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

शहराची वाढती लोकसंख्या पाहता शहरातून दररोज अंदाजे २० टनापेक्षा अधिक घरगुती कचरा संकलित केला जातो. या कचऱ्यात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक आढळते, तसेच बाजारपेठेतील दुकानदार, किरकोळ विक्रेत्यांकडून पत्रास मायक्रोनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांची सर्रास विक्री व वापर केला जात आहे. शहरात असंख्य हॉटेल्स, चायनीज, वडापाव विक्रेते, तसेच कापड दुकानदार, भाजीवाले, व्यापारी व इतर व्यावसायिक, हातगाडीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्यांचा वापर वाढला आहे. त्यामुळे बाजारपेठ, भाजी मंडईची मागील बाजू, उत्कर्ष नगर दातार आळी, बोरगांव रोड, झिराळ आळी, कुंभार तलाव परिसर, भोगावती नदी परिसर, नगरपालिका स्टेडिअमच्या मागील बाजू आदी ठिकाणी प्लास्टिक कचरा दिवसेंदिवस साचत आहे. पेण नगरपालिकेच्या माध्यमातून प्लास्टिक पिशव्यांविरोधात पुन्हा मोहीम सुरू करण्यात आली आहे.

### ही मोहीम अशीच सुरू राहील

पेण नगरपालिकेकडून २० ते २५ दुकानांची तपासणी करण्यात आली. यावेळी ७ ते ८ दुकानांमध्ये सुमारे १०० किलो प्लास्टिक पिशव्यांचा साठा सापडला. या कारवाईत सुमारे १६ हजार ३०० रुपयांचा दंड नगरपालिकेकडून वसूल करण्यात आला असून मिळालेला साठा जप्त करण्यात आला असल्याची माहिती पेण नगरपालिकेचे आरोग्य निरक्षक दया गावंड यांनी "नवशक्ति"ला दिली. तसेच प्लास्टिक पिशव्यां विरोधातील ही मोहीम अशीच सुरू राहील, असे अतिक्रमण आणि वसूली विभाग प्रमुख महेश वडके यांनी सांगितले. या प्लास्टिकविरोधी मोहिमेत कमलाकर आवासकर, अक्षय म्हात्रे आणि बाळा मोरे आदी कर्मचारी सहभागी झाले होते.